आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१९ जुलै २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मायक्रोसॉफ्ट कंपनीचं सॉफ्टवेअर बंद पडल्यानं जगभरातले उद्योग, बँकिंग सेवा आणि विमान कंपन्यांची माहिती तंत्रज्ञान यंत्रणा कोलमडली
- संरक्षण गौरव समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ९४ जणांना सेवा पदकं प्रदान
- वादग्रस्त प्रशिक्षणार्थी सनदी अधिकारी पूजा खेडकर यांच्या विरोधात केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून गुन्हा दाखल, कारणे दाखवा नोटीसही जारी
- आगामी विधानसभा निवडणूक आपापल्या मित्रपक्षांसोबत एकत्रितपणे लढवण्याची महायुती आणि महाविकास आघाडीची भूमिका
- शेअर बाजारातल्या तेजीला लगाम /मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ७३९, तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीत २७० अंकांची घसरण

**आणि**

- महिला आशिया चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेत दाम्बुला इथं सुरु असलेल्या सामन्यात भारताच्या गोलंदाजांचा पाकिस्तानवर दबाव

**<><><><><>**

मायक्रोसॉफ्ट कंपनीचं सॉफ्टवेअर बंद पडल्यानं जगभरातले उद्योग, बँकिंग सेवा आणि विमान कंपन्यांची माहिती तंत्रज्ञान यंत्रणा आज कोलमडून पडली आहे. त्यामुळे भारतात विविध विमान कंपन्यांची बुकिंग, चेक-इनची ऑनलाइन सेवाही ठप्प झाली. याचा सर्वाधिक फटका मुंबई विमानतळाला बसला असून विमानसेवा सरासरी ५० मिनिटे उशिरानं सुरू आहे. समस्या सोडवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं विविध विमान कंपन्यांनी सांगितलं आहे.

सरकार मायक्रोसॉफ्टशी संपर्कात असून या बिघाडामागचं कारण सापडल्याची माहिती, माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. क्राऊडस्ट्राईक या अमेरिकेच्या सायबर सुरक्षा देणाऱ्या कंपनीशी या बिघाडाचा संबंध असल्याचं वृत्त आहे. सुरक्षेसंदर्भातली माहिती गोळा करण्यासाठी अनेक व्यावसायिक संगणकांमधे फाल्कन सेन्सर बसवल्यामुळे ही समस्या निर्माण झाली असून ती सोडवण्यासाठी अंभियंते प्रयत्नशील असल्याचं कंपनीनं सांगितलं.

दरम्यान, या परिस्थितीवर नागरी विमान वाहतूक संचालनालय आणि नागरी विमान वाहतूक मंत्रालय लक्ष ठेवून असल्याची माहिती नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली आहे. त्यामुळे प्रवाशांनी प्रत्यक्ष चेक-इन आणि बोर्डिंग प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी लवकर विमानतळावर पोहोचावं अशी विनंती अनेक विमान कंपन्यांनी केली आहे.

**<><><><><>**

नवी दिल्ली इथं राष्ट्रपती भवनात झालेल्या संरक्षण गौरव समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ९४ विशिष्ट सेवा पदकं प्रदान केली. यात ३१ जणांना परम विशिष्ट सेवा पदकं, ४ जणांना उत्तम युद्ध सेवा पदकं,५७ जणांना अति विशिष्ट सेवा पदकं तर दोघांना पुन्हा एकदा अतिविशिष्ट सेवा पदकं बहाल करण्यात आली. यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना उपस्थित होते.

**<><><><><>**

हवामान बदलाचं आव्हान आज जागतिक पातळीवर आपल्यासमोर उभं असल्याचं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. समुद्रांच्या

पातळीत वाढ, दीर्घकालीन दुष्काळ, वणवे, चक्रीवादळं हे सगळे हवामान बदलाचेच परिणाम असून त्यांचा फटका संपूर्ण जगाला बसत आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

बँकांनी कर्ज आणि वाढत्या ठेवी, यामधल्या तफावतीकडे लक्ष ठेवावं आणि कर्जाचं प्रमाण ठेवींपेक्षा कमी राहील, याची दक्षता घ्यावी, अशी सूचना भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी केली आहे. ते आज मुंबईत एका खासगी कार्यक्रमाला संबोधित करत होते. कर्ज आणि वाढत्या ठेवींमधला फरक, यामुळे वित्तीय प्रणालीपुढे संरचनात्मक तरलतेशी निगडित समस्या निर्माण होऊ शकते, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

<><><><><>

वादग्रस्त प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या विरोधात केंद्रीय लोकसेवा आयोगानं गुन्हा दाखल केला आहे. परीक्षेच्या नियमांचं उल्लंघन करत पूजा खेडकर यांनी स्वतःचं, वडिलांचं आणि आईचं नाव बदललं, छायाचित्र, स्वाक्षरी, ईमेल आयडी, मोबाईल नंबरसह पत्ता बदलून आपली खोटी ओळख दाखवल्याचा आरोपही त्यांच्यावर ठेवला आहे. तसंच सनदी सेवेतली त्यांची निवड रद्द का करु नये यासाठी कारणे दाखवा नोटीसदेखील जारी केली आहे.

दरम्यान, पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांच्यावर छळाचे आरोप केल्या संदर्भात पूजा खेडकर यांना उद्या २० तारखेला पुण्यात जबाब नोंदवण्यासाठी दुसरी नोटीस दिली आहे. त्यांना याआधी नोटीस देऊन काल उपस्थित राहायला सांगितलं होतं, मात्र त्या उपस्थित राहिल्या नव्हत्या.

<><><><><>

आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातल्या सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडीमध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे. या दोन्ही आघाड्या आपापल्या मित्रपक्षांसोबत एकत्रितपणे निवडणूक लढवणार आहेत.

आगामी विधानसभा निवडणूक महायुती सर्वशक्तीनिशी एकत्रितपणे लढवणार असल्यामुळे तिला सर्वाधिक जागा मिळतील, असा विश्वास भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. ते आज आज मुंबईत भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या वार्ताहर परिषदेत बोलत होते. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं भारतीय जनता पार्टी जवळपास ९७ हजार बूथ, शक्तीकेंद्र तसेच मंडल स्तरावर संघटना मजबूत करायला प्राधान्य देणार आहे. २१ जुलै रोजी पुण्यात पक्षाचं अधिवेशन होणार आहे, असंही त्यांनी सांगितलं. विधानसभा निवडणुकीसोबतच भाजपा, पंचायत समिती, जिल्हा परिषद, ग्राम पंचायत आणि महापालिका निवडणुकांच्या तयारीला लागणार आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

महाविकास आघाडी आगामी विधानसभा निवडणुकीला एकत्र सामोरी जाणार असून तिन्ही घटकपक्ष एकत्र बसून जागावाटपावर चर्चा करतील, अशी माहिती अखिल भारतीय काँग्रेस समितीचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी दिली आहे. काँग्रेस पक्षाच्या प्रमुख नेत्यांची आज मुंबईत बैठक झाल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. या बैठकीत काँग्रेसचं संघटन मजबूत करण्यावर चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं.

महाविकास आघाडी विधानसभा निवडणुकीतही राज्यातल्या महाभ्रष्ट महायुती सरकारला सत्तेपासून दूर करेल, असा निर्धार या बैठकीत केल्याचं वेणुगोपाल यांनी नमूद केलं. या बैठकीला महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले,

विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण आणि इतर नेते उपस्थित होते.

<><><><><>

शेअर बाजारातल्या गेल्या ४ सत्रांमधल्या तेजीला आज आळा बसला. आज सकाळच्या सत्रात दोन्ही निर्देशांकांनी विक्रमी उंची गाठली होती. मात्र ही तेजी फार काळ टिकू शकली नाही. गुंतवणूकदारांनी विक्रीवर भर दिल्यामुळे बाजार बंद होताना मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ७३९  अंकांनी घसरला आणि ८० हजार ६०५ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २७० अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ५३१ अंकांवर बंद झाला.

जागतिक बाजारातली कमकुवत स्थिती आणि अमेरिका आणि चीन दरम्यानचा वाढता व्यापार तणाव आजच्या घसरणीला कारणीभूत ठरल्याचं बाजार विश्लेषकांनी सांगितलं.

<><><><><>

नीट-युजी प्रवेश परीक्षा पेपर-फुटी प्रकरणी सीबीआयनं आज रांची इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस या संस्थेच्या एका विद्यार्थिनीला अटक केली. सीबीआयनं या विद्यार्थिनीचा मोबाईल, लॅपटॉप आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणं जप्त केली आहेत.

<><><><><>

आज सुरु झालेल्या महिला आशिया चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना सुरु आहे. श्रीलंकेत दाम्बुला इथं रनगिरी दाम्बुला आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर सुरु असलेल्या या सामन्यात पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला. मात्र भारतीय गोलंदाज

त्यांचे फलंदाज झटपट बाद करत आहेत. शेवटची बातमी हाती आली तेव्हा पाकिस्तानच्या ६ षटकात ६ बाद ६७ धावा झाल्या होत्या.

आज दुपारी झालेल्या स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात नेपाळनं संयुक्त अरब अमिरातीच्या संघावर ६ गडी राखून विजय मिळवला आहे.